| MHKO050002802023 | नियमित दिवाणी दावा क्रमांक ३२/२०२३ मधील निशाणी ५ वरील आदेश<br>बॅक ऑफ महाराष्ट्र वि. कांचन सुर्वे व इतर |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादीविरुध्द दिवाणी न्यायप्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १, २ व कलम १५१ प्रमाणे तुर्तातुर्त मनाई ताकीद देवविण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादीने अर्जामध्ये असे कथन केले की, जिल्हा कोल्हापूर तालुका हातकणंगले पैकी इचलकरंजी येथील रि.स.नं.४५/पैकी/८(याचा जुना रि.स.नं.४५१) मधील प्लॉट नं.७, क्षेत्र ० हे. १.३० आर (१२०.४७ चौ.मी) यामधील क्षेत्र १३२.९६ चौ.मी ची बांधीव आर.सी.सी इमारत याचा इचलकरंजी महानगरपालिका वॉर्ड नं. १३, घर नं. १७४/1 ची घर व खुली जागा मिळकत यासी चतुःसीमा, पूर्वेस २५ फूट रस्ता, पश्चिमेस श्री.दातार यांची मिळकत, दक्षिणेस रि.स.नं.४५१ ची मिळकत व उत्तरेस रि.स.नं.४५१/1 ची मिळकत. येणेप्रमाणे चतुःसीमेतील आर.सी.सी घर मिळकत व खुली जागा मिळकत व त्यामधील तदंगभूत वस्तुसह व इजमेंटरी हक्कासह सर्व यापुढे दावा मिळकत असे संबोधले आहे.

३. यातील वादी बँक ही दि.बँकिंग कंपनीज (अॅक्वीजीशन अॅण्ड ट्रान्सफर ऑफ अंडरटेकींग) अॅक्ट १९७० नुसार स्थापन झालेली बँक असून वादी बँकेचे मुख्य कार्यालय लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे येथे असून याची शाखा इचलकरंजी येथे आहे. वादीने दावा दाखल करणे, दावा चालवणे इत्यादी अधिकार वादी बँकेचे सिनियर मॅनेजर मृगंक तिवारी यांना दि.२०/१०/२०२२ रोजीचे अधिकारपत्राने दिलेले आहेत. दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.२ यांनी तनसुखराज बालशिन मंत्री यांचेकडून रजि दस्त क्र.१७१८ ने दि.०७/०५/१९९९ रोजी खरेदी घेतली आहे व दावा मिळकतीबाबत दि.१८/०६/२००९ रोजी मा. उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी यांचेकडून गुंठेवारी करुन घेतली आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.५ हिने वादी बँकेस कर्जाची मागणी केल्यावरुन रक्कम रुपये १८,५०,०००/- इतकी रक्कम दि.२५/०६/२०१३ रोजी मंजूर केले व त्यावेळी दावा मिळकत जामिनदार या नात्याने

प्रतिवादी क्र.२ यांचेकडून रजि.दस्त क्र.५२८५/२०१३ दि.१५/०७/२०१३ ने वादी बँकेने तारण घेतली. सदर कर्जाची नोंद दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी फेरफार क्र.५२८८१ ने झाली आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.५ हिचे नावे वादी बँकेने रक्कम रु.१४,५०,००० कॅश क्रेडिट वाढवून दिले व त्यावेळी प्रतिवादी क्र.२ याने जामिनदार या नात्याने दावा मिळकत रजि.दस्त क्र.५०९६/२०१६ रोजी दि.०९/१२/२०१६ रोजीचे दस्ताने वादी बँकेस तारण दिली. यातील प्रतिवादी क्र.५ हिस वादी बँकेने एफ.आय.टी.एल लोन रक्कम रु.३,४७,०००/- मंजूर केले आहे. प्रतिवादी क्र.५ हिचे नावे दिलेले कर्ज दि.२६/०३/२०२१ रोजी एन.पी.ए मध्ये गेल्याने वादी बँकेने प्रतिवादी क्र.२ व ५ तसेच जामिनदार यांना दि.०८/०४/२०२१ रोजी SARFAESI Act २००२ चे कलम १३(२) प्रमाणे नोटीस पाठविली असता ती प्रतिवादी क्र.२ व ५ तसेच जामिनदार यांना मिळाली आहे. प्रतिवादी क्र.५ हिने वादी बँकेस दि.२६/०४/२०२१ रोजी खोटी हरकत पाठविली. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी संगनमत करुन दावा मिळकतीबाबत सिव्हील जज ज्युनिअर डिव्हीजन, इचलकरंजी यांचे कोर्टात दि.१४/०९/२०२१ रोजी रे.क.नं.२४६/२०२१ चा प्रतिवादी क्र.१ हिने वटमुखत्याराआधारे बोगस व खोटा वाटपाचा व कायम मनाईचा दावा दाखल केला. सदरचा खोटा दावा दाखल करतेवेळी दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी वादी बँकेचा कर्जाचा बोझा होता व आहे. वादी बँकेने मे.मुख्य न्यायदंडाधिकारीसो, कोल्हापूर यांचे कोर्टात SARFAESI Act कलम १४ प्रमाणे फौ.किर.अर्ज८६०/२०२१ चा अर्ज दि.१४/१०/२०२१ रोजी दाखल केला आहे. याची जाणीव प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना झाली असता त्यांनी संगनमत करुन व मे.कोर्टाची फसवणूक करुन दि.१२/०३/२०२२ रोजी बेकायदेशीररीत्या आपसात तडजोड करुन दावा मिळकतीचे वाटणी करुन घेतली व त्यानूसार मा. कोर्टानी रे.क.न.२४६/२०२१ चा दावा निकाली करुन त्याप्रमाणे हुकूमनामा पारीत केला. त्याआधारे प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी मे.तलाठी ऑफिस इचलकरंजी येथे ७/१२ पत्रकी नावे नोंद होणेसाठी दाखल केला असून वादी बँकेने हरकत घेतली परंतू मा.मंडल अधिकारी, इचलकरंजी यांनी क्र./तक्रार/एस.आर/२६७/२०२२ चे कामी दि.०२/०१/२०२३ रोजी बेकायदेशीररीत्या फेरफार क्र.६६२७३ चा फेरफार मंजूर करुन बोगस व बेकायदेशीर हुकूमनाम्याची नोंद ७/१२ पत्रकी होणेबाबत आदेश केला. फौ.किर.अर्ज क्र.८६०/२०२१ चा अर्ज दि.२८/१२/२०२२ रोजी मंजूर झाला आहे. प्रतिवादी क्र.१ ते ५ हे केवळ वादी बँकेच्या SARFAESI Act चे कारवाईस हरकत अगर अडथळा करण्याच्या उददेशाने रे.क.नं.२४६/२०२१ चे कामी झालेल्या बेकायदेशीर हुकूमनाम्याचा आधार घेत आहे व वादी

बँकेस दावा मिळकतीबाबत कारवाई करणेस हरकत व अडथळा करत आहेत. यातील प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी रे.क.नं.२४६/२०२१ चे कामी घेतलेला निकाल व हुकूमनामा हा बेकायदेशीर व प्रथमदर्शनी रद्द होणेस पात्र असून सदरचा निकाल व हुकूमनामा वादी बँकेवर लागू व बंधनकारक नाही असे हक्कज्ञापन होणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचेकडून वादीस कॅव्हीट ची नोटीस प्राप्त झालेली नाही. प्रथमदर्शनी केस, न्यायाचा तराजू वादी बँकेच्या वतीने असून तुर्तातूर्त मनाई अर्ज मंजूर न केलेस वादी बँकेचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल. तरी सदर अर्जाद्वारे विनंती केली आहे की, यातील प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी रे.क.नं.२४६/२०२१ चे कामी झालेल्या दि.१२/०३/२०२२ इत्यादी रोजीचे बेकायदेशीर हुकूमनाम्याची अंमलबजावणी करु नये, तसेच प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी वादी बँकेच्या कायदेशीर हक्कावर हरकत अगर अडथळा करु नये अशी दाव्याचा निकाल लागेपर्यंत तुर्तातूर्त मनाई ताकिद व्हावी.

४. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी निशाणी १९ वर म्हणणे दाखल केले असून दाव्यास व सदरच्या अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानूसार सदर अर्जातील मजकूर पूर्णपणे खोटा, लबाडीचा व बिनबूडाचा असल्यामूळे तो प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना मान्य व कबूल नाही. यातील प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१,३ व ४ यांच्या स्वकमाईमधून एकत्रात असताना निव्वळ प्रतिवादी क्र.२ हे वडिल असलेमूळे दावा मिळकत त्यांचे नावे खरेदी केलेली सदर मिळकत खरेदी करीत असताना प्रतिवादी क्र.१,३ व ४ यांनी त्यांच्या हिस्सेस येणारी रक्कम दिलेली आहे. त्यामूळे दावा मिळकत ही एकत्रित कुटूंबातील आहे. त्यामूळे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना वाटणी मागण्याचा कायदेशीर हक्क व अधिकार होता व आहे. त्यामूळे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी मा.दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर, इचलकरंजी यांचे कोर्टात रे.क.नं.२४६/२०२१ दाखल केलेला होता व आहे. त्यावेळी सुध्दा दावा मिळकतीचा ७/१२ उतारा वादी यांच्या कर्ज बोजासहित मा.कोर्टात दाखल केलेला होता. त्यामूळे वादी बँकेस फसविण्याचा इरादा प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचा नव्हता व नाही. सदरची बाब वादी यांना समजल्यानंतर वादी यांनी त्या आदेशाविरुध्द आजतागायत कोणत्याही सक्षम अप्पर न्यायालयामध्ये अपिल दाखल केले नाही. त्यामूळे वादी यांचा दावा सकृतदर्शनी चालणेस पात्र नाही. तसेच तुर्तातूर्त मनाई मागण्याचा वादी बँकेस कायदेशीर अधिकर प्राप्त होत नाही. फौ.किर.अर्ज.नं.८६०/२०२१ च्या आदेशाविरुध्द प्रतिवादी यांनी मा.डी.आर.टी कोर्ट, पूणे यांचेकडे Securitization Application नं.१८/२०२३ दाखल

करुन I.A.Application नं.१७५/२०२३ वरती मा. कोर्टानी मे.मुख्य न्यायदंडाधिकारीसो, कोल्हापूर यांनी दिलेल्या आदेशास स्थगिती दिलेली आहे. त्याप्रमाणे वादी यांनी मा.कोर्टाच्या आदेशाप्रमाणे ३१ जानेवारी २०२३ रोजी रुपये ५ लाख व आदेशापासून दोन महिन्यात १० लाख रुपये असे एकूण १५ लाख रुपये कर्जाच्या परतफेडीपोटी वादी बँकेमध्ये भरले आहेत. त्यामूळे वादी बँक व प्रतिवादी यांचेमध्ये तडजोड करण्याचा प्रयत्न करावा असे देखील मा.डी.आर.टी.कोर्ट, पूणे यांनी गाईडलाईन दिलेली आहे. त्यामूळे मे.मुख्य न्यायदंडाधिकारीसो, कोल्हापूर यांनी काढलेला जप्ती आदेश सध्या अस्तित्वात असल्यामूळे मा.डी.आर.टी.कोर्ट, पूणे यांचे कोर्टात सदर दाव मिळकतीचा वाद न्यायप्रलंबित असल्याने दावा चालणेस पात्र नाही. मा.दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर यांनी दावा मिळकतीच्या वाटण्या केल्याप्रमाणे ७/१२ पत्रकी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या नावाची नोंद मंडळ अधिकारी, इचलकरंजी यांनी फेरफार क्र.६६२७३ ने घातलेली आहे व त्या फेरफाराविरुध्द वादी बँकेने अप्पर महसूल कोर्टात आजतागायत कोणतेही आर.टी.एस.अपिल दाखल केलेले नाही. तरी वादीचा सदर तूर्तातूर्त मनाईचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

५. वादीतर्फे विद्वान वकिल श्री.पी.एन.शर्मा व प्रतिवादीतर्फे विद्वान वकिल श्री.एस.एस.नरंदेकर यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे सूक्ष्मपणे अवलोकन केले.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीवतीने प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नकारार्थी |
| २. | तौलनिकदृष्टया केस वादीच्या वतीने आहे काय? | नकारार्थी |
| ३. | अंतरिम मनाई दिली नाही तर वादीचे अपरीमित नुकसान होईल काय ? | नकारार्थी |
| ४. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणे

६. सदर अर्जाच्या पृष्ठयर्थ वादी यांनी दाव्यासोबत निशाणी ३ सोबत रे.क.नं.२४६/२०२१ मधील तडजोड पुरसिस, हुकूमनामा, दावा निशाणी ३, रोजनामा, मा.तलाठी इचलकरंजी यांनी दिलेली नोटीस, वादीने मा.मंडळ अधिकारी यांना दिलेली तक्रार,

रजि.दस्त क्र.१७१८/१९९९, ५२८५/२०१३, ५०९६/२०१६ इत्यादी दस्त, फौ.किरकोळ अर्ज क्र.८६०/२०२१ मधील निशाणी ८ वरील आदेश, तसेच अंतिम आदेश इत्यादी दस्तऐवज दाखल केले आहेत. प्रतिवादीतर्फे निशाणी १७ व १८ च्या दस्तऐवज यादीसोबत मा.डी.आर.टी कोर्ट पूणे यांची एस.ए.नं.१८/२०२३ मध्ये केलेला आदेशाची झेरॉक्स प्रत, प्रतिवादी यांनी वादी बँकेत पैसे भरल्याबाबत पावत्या ही कागदपत्रे दाखल केली आहेत. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले.

<u>मुद्दा क्र. १ ते ३ करीता</u>-

७. पुनरोक्ती टाळण्यासाठी मुद्दा क्र १ ते ३ ची कारणे एकत्रित चर्चिली आहेत.

८. प्रतिवादी यांनी निशाणी २२ च्या अर्जासोबत खालील दोन न्यायनिवाडे दाखल केले आहेत.

१. *वसान सिंगव इतर विरुध्द लाखा सिंग व इतर (२००५) १४१ PLR ६३*

२. *ब्रजेशकुमार अवस्थी व इतर विरुध्द स्टेट ऑफ एम.पी. व इतर एआयआर २००७ एमपी १३९*

उपरोक्त दोन्ही न्यायनिर्णयांचे अवलोकन केले. उपरोक्त दोन्ही न्यायनिर्णयमधील वस्तूस्थिती व सदर दाव्यातील वस्तूस्थिती भिन्न असल्याने सदर न्यायनिर्णयामधील निर्देश हे सदर निशाणी ५ करीता लागू होत नाहीत.

९. सदरचा दावा हा वादीने हक्कज्ञापनाकरीता दाखल केला असून वादीने अशी विनंती केली आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी रे.क.नं.२४६/२०२१ च्या दावे कामी दि.१२/०३/२०२२ इत्यादी रोजी केलेला आपसात तडजोड व हुकूमनामा वादी बँकेवर लागू व बंधनकारक नाही असे हक्कज्ञापन व ठरवून मिळावे. सदर दाव्यात तुर्तातूर्त मनाई ताकिद मागितली आहे. रे.क.नं.२४६/२०२१ हा दावा निकाली निघाला आहे. सदर दाव्यात हुकूमनामादेखील झाला आहे असे अभिलेखावर दाखल दस्तऐवजावरुन दिसून येते. सदरचा दावा हा लोक अदालतमध्ये निकाली निघाला होता असे दिसून येत आहे. लोक अदालतीतील तडजोडीप्रमाणे दावा निकाली निघाला असल्याने व दाव्याचा हुकूमनामा झाला असल्याने सदर हुकूमनाम्याची अंमलबजावणी करु नये असा तुर्तातूर्त मनाई हुकूम देणे न्यायोचित होणार

नाही. एकदा निकाल झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी होवू नये असा तूर्तातूर्त मनाई हुकूम या न्यायालयास सध्याच्या दाव्याच्या स्टेजला देता येणार नाही. रे.क.नं.२४६/२०२१ या दाव्याचा निकाल लोकअदालतमध्ये झाला असल्याने सदर दाव्याच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणीस स्थगिती या न्यायालयास देता येणार नाही. वादी यांना लोक न्यायालयामध्ये झालेला निकाल अथवा हुकूमनामा मान्य नसल्यास वादी हे मा.वरिष्ठ सक्षम न्यायालयामध्ये कायदयानूसार योग्य ती दाद मागू शकतात. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी संगनमत करुन व न्यायालयाची फसवणूक करुन सदरचा दावा दाखल केला आहे व दि.१२/०३/२०२२ रोजी लोक न्यायालयात बेकायदेशीरपणे आपसात तडजोड करुन हुकूमनामा प्राप्त करुन घेतला. सदर बाबी वादी यांना पुराव्यानिशी सिध्द करणे आवश्यक आहे. तसेच दोन्ही पक्षांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. सदर दाव्यात अदयाप पूरावा झालेला नाही. उपरोक्त सर्व कारणांमूळे प्रथमदर्शनी असे दिसून येते की, सदरचा अर्ज मंजूर झाल्यास वादीचे कोणतेही नूकसान होणार नाही. परंतू प्रतिवादीचे अपरिमित नूकसान होवू शकते. कारण आज रोजी प्रतिवादी यांच्या बाजूने रे.क.नं.२४६/२०२१ चा न्यायनिर्णय व हुकूमनामा झाला आहे. त्यामूळे प्रतिवादीस प्रथमदर्शनी केस असल्याचे दिसून येत आहे. तसेच न्यायाचा समतोल प्रतिवादीच्या बाजूने असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. उपरोक्त सर्व कारणांमूळे हे न्यायालय या निष्कर्षाप्रत आले आहे की, निशाणी ५ कडील अर्ज नामंजूर करणे न्यायोचित होईल. त्यामुळे मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवत आहे व मुद्दा क्र. ४ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे-

## आदेश

१. निशाणी ५ कडील तुर्तातुर्त ताकीद अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाहीत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MRUNMAYEE M CHOUDHARY
Date: 2023.06.16 17:03:49 +0530

**ठिकाण - इचलकरंजी.**
**दिनांक - १६/०६/२०२३**

**(एम.एम.चौधरी)**
**४ थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**इचलकरंजी.**